SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR KNOWLEDGE RESOURCE CENTER
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र
Phone (Direct) : +91-0231- 2609204 Office : 2609205, Deputy Librarian : 2609[illegible]
Asst. Librarian : 2609421, 2609212 Stack : 2609213, Circulation : 2609210
Periodical : 2609208, Archival : 2609336, Reference : 2609209
Website URL : http://www.unishivaji.ac.in/library E-mail : subbkl@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/BBKKRC/ ग्रंथमहोत्सव-२०२० / Date :
शि.वि./बॅ.बा.ख.ज्ञा.स्त्रो.कें./ दिनांक : 03 FEB 2020
No 0022

प्रति,
मा. प्राचार्य /एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी/एन. सी. सी. अधिकारी/
समन्वयक/संचालक/ ग्रंथपाल

**विषय : "ग्रंथमहोत्सव २०२०" मध्ये सहभागी होणेबाबत.**

महोदय / महोदया,

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ वा दीक्षांत समारंभ गुरूवार, दिनांक ०६ फेब्रुवारी २०२० रोजी विद्यापीठ प्रांगणात संपन्न होणार असून सदर समारंभाचे औचित्य साधून सलग १४ व्या वर्षी **'ग्रंथमहोत्सव २०२०'** या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०५ ते ०६ फेब्रुवारी २०२० या दरम्यान आयोजित करण्यात येत आहे. या निमित्ताने कार्यक्रमात नामवंत भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजीटल ग्रंथ, उपहारगृह इत्यादीने विविध ३० स्टॉल्स लावण्यात येणार असून **दि. ०५ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रंथमहोत्सव स्टॉलचे उद्घाटन मा.कुलगुरू डॉ.** देवानंद शिंदे यांच्या शुभ हस्ते होणार आहे. तद्नंतर सकाळी ११.०० वाजता संगीत व नाटयशास्त्र विभागाचा 'गीतबहार' हा सांस्कृतिक कार्यक्रम राजमाता जिजाऊ साहेब सभागृह येथे होणार आहे. **दि. ०६ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत मा.कुलगुरू डॉ. देवानंद** शिंदे यांच्या शुभ हस्ते ग्रंथदिंडी–पालखी मिरवणूक सोहळयाचे उद्घाटन **कमला कॉलेज, कोल्हापूर येथे** होणार आहे.

सदरच्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट वाचनसंस्कृतीला चालना देणे हेच आहे. तरी सदरच्या कार्यक्रमाचा लाभ वाचनप्रेमी मंडळी, प्राचार्य, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथपाल व विद्यार्थी–विद्यार्थीनींनी घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच विद्यापीठाचे परिपत्रक क्र.४०१० दि. १७/०७/२०१९ नुसार **शिक्षकांची वैयक्तिक ग्रंथालय योजने (TPLS)** अंतर्गत खरेदी करावयाच्या पुस्तकांची मुदत दि. १५ फेब्रुवारी २०२० पर्यंत वाढविण्यात आली असून या योजनेअंतर्गत सर्व शिक्षकांना व ग्रंथपालांना स्टॉल्सना भेट देऊन पुस्तक खरेदी करिता प्रोत्साहित करावे. **तसेच याद्वारे असेही आवाहन करण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील ग्रंथपालांना, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी. व एन. सी. सी. अधिकारी/ समन्वयकांना 'ग्रंथमहोत्सव व 'ग्रंथदिंडी – पालखी मिरवणूकीत' सहभागी होणेस सांगावे.** कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शिक्षक, ग्रंथपाल व विद्यार्थी विद्यार्थीनीच्या निदर्शनास आणावे ही विनंती. सहभागी सर्वांना ग्रंथदिंडी उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येईल.
कळावे,

आपली विश्वासू
NKhot 3/2/2020
डॉ. नमिता खोत
संचालक ज्ञान स्त्रोत केंद्र तथा
समन्वयक ग्रंथमहोत्सव २०२०

सोबत– निमंत्रण पत्रिका

Library Website
4/02/2020

INWARD No. 1180
G.K. G. College, Kolhapur.
Date : 04/02/2020